# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## जाहीर प्रकटन

### महाविद्यालय स्तरावर घेतलेल्या परीक्षांतर्गत छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मधील उन्हाळी २०२५ सत्र परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर परीक्षांच्या सोबत जोडलेल्या अभ्यासक्रमांचे निकाल दिनांक ०२ जून, २०२५ रोजी विद्यापीठाच्या **https://onlineresults.unipune.ac.in/Result/Dashboard/Default** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आलेले आहेत.

सोबत जोडलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येत आहे की, सोबत जोडलेल्या अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत गुणपडताळणीसाठी/ पुनर्मूल्यांकनासाठी ज्या विद्यार्थ्यांना हव्या आहेत त्यांच्यासाठी दिनांक **०५ जून, २०२५** ते **१४ जून, २०२५** या कालावधीसाठी पुनर्मूल्यांकन प्रक्रिया ऑनलाईन अर्ज करण्याची लिंक सुरु करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सशुल्क ऑनलाईन अर्ज केल्यानंतर तो अर्ज त्या त्या महाविद्यालय/परिसंस्थेकडे ऑनलाईन पोर्टलद्वारे दृश्य होईल. अर्जदार विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेकडून ज्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करायचे आहे, तिची छायांकित प्रत प्राप्त करून घ्यावी आणि मा. प्राचार्य व मा. संचालक हयांनाही असे निर्देशित करण्यात येत आहे, की आपण संबंधित विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध करून द्यावी.

ज्या विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासपत्रिकेच्या मूल्यांकनाबाबत शंका आहेत त्यांनी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त होताच संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेकडून पुनर्मूल्यांकन करून घ्यावे. महाविद्यालय/परिसंस्थांनीही पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया तात्काळ पार पाडावी. पुनर्मूल्यांकन प्रक्रियेनंतर संबंधित महाविद्यालय/परिसंस्था ऑनलाईन पोर्टलवर त्या त्या विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे गुण भरतील आणि त्या आधारे विद्यापीठाकडून संबंधित विद्यार्थ्यांचे सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमनिहाय निकाल पुनर्मूल्यांकनातील बदलासह पुनर्प्रदर्शित होतील, याची विद्यार्थी, पालक, प्राचार्य, संचालक, परीक्षा अधिकारी यांनी नोंद घ्यावी. हे परिपत्रक संबंधित सर्व घटकांच्या तात्काळ निदर्शनास आणून याबाबत संबंधितांस अवगत व जागरूक करावे आणि कार्यवाही करावी.

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा. क्र. परीक्षा छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन कक्ष/२८८ दिनांक : ०३ जून, २०२५.

| No. | Name of Examination & Patterns |
| --- | --- |
| 1 | First Year LLB(2023 PATTERN) April-2025 |
| 2 | First Year B.A.LL.B(2023 PATTERN) April-2025 |